## आजचे पंचांग

रविवार दि. ७ जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, सप्तमी रात्री ३-२५ पर्यंत नंतर अष्टमी तिथी, दिवस नक्षत्र- धनिष्ठा सकाळी ७-५६ पर्यंत नंतर शततारा, चंद्र रास - कुंभ, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - कर्क

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## लाचखोर तहसीलदार

**अंबड** : प्रामाणिकपणाचा दिखावा करीत कारवायांचा धडाका उडवून चर्चेत राहणारा अंबडचा तहसीलदार विजय चव्हाण अखेर वाळूच्या नादात फसला. बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले आणि पथकाने शनिवारी सायंकाळी चव्हाण यास तब्बल ६ लाख ४० हजार रुपयांची लाच घेताना पकडले. अवैध वाळू उपसा करणाऱ्या पोकलेन मशीनवर जप्तीची कारवाई न करण्यासाठी चव्हाण याने ७ लाख रुपयांच्या मासिक हप्त्याची मागणी केली होती.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. ०७ जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २५२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### प्रज्ञानानंदाचे अभिनंदन

**नवी दिल्ली** : नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकावणारा पहिला भारतीय खेळाडू म्हणून कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी शनिवारी त्यांचे अभिनंदन केले आहे. एक्स वर एका पोस्टमध्ये, खर्गे यांनी त्याचे वर्णन आमचा युवा स्टार म्हणून केले आणि म्हटले की, तुमची विलक्षण प्रतिभा, संयम आणि अथक दृढनिश्चयामुळे देशाचा अभिमान वाढला आहे. येत्या काही वर्षांत तुम्हाला असेच यश आणि अनेक यश मिळो यासाठी शुभेच्छा, असे राहुल गांधी म्हणाले.

### उत्तर प्रदेशात गोळीबाराच्या घटना

**चंदौली/अलिगड** : चंदौली जिल्ह्यात शनिवारी झालेल्या गोळीबारात एका ३८ वर्षीय तरुणाची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली, तर ४५ वर्षीय महिला जखमी झाली. चंदौली येथील अलीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणारे मनोज कुमार दुपारी २.३० च्या सुमारास पटपारा गावाजवळ सायकल चालवत होते. अलीनगरचे स्टेशन हाऊस हाऊस ऑफिसर घनश्याम शुक्ला यांनी सांगितले की, मोटारसायकलवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी कुमार यांना मंदिरात गोळ्या घालून ठार केले.

### मुलाला वाचवताना महिलेचा मृत्यू

**कोझिकोड** : उत्तर जिल्ह्यातील कुट्टियाडी येथे कपडे धुतताना दोघे नदीत वाहून गेल्याने एका महिलेचा मृत्यू झाला आणि तिच्या सात वर्षांच्या मुलाचा शोध मोहीम सुरू आहे. रेम्या (वय ३६, रा. कैथेरीमुक्कू, कुट्टियाडी) असे मृताचे नाव आहे. पोलीस, अग्निशमन आणि बचाव सेवेचे कर्मचारी आणि स्थानिक रहिवासी बेपत्ता असलेल्या रेम्याचा मुलगा शिवानंद यांचा शोध घेत आहेत.

## जंतर-मंतरवर सीजेपीचे आंदोलन

# आंदोलन झाले, राजीनामा कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : नीट परीक्षा पेपरफुटी आणि विविध राष्ट्रीय परीक्षांमधील कथित गैरव्यवहारांच्या निषेधार्थ कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) वतीने शनिवारी जंतर-मंतर येथे आंदोलन करण्यात आले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी देशभरातून विद्यार्थी, तरुण आणि विविध क्षेत्रांतील नागरिक या आंदोलनात सहभागी झाले.



आंदोलनस्थळी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीच्या घोषणा देण्यात आल्या. स्पर्धा परीक्षा आणि शैक्षणिक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या प्रश्नावर केंद्र सरकारने जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके अमेरिकेहून दिल्लीत परतल्यानंतर थेट आंदोलनस्थळी पोहोचले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना तरुणांनी अन्यायाविरोधात लढा सुरू ठेवावा, असे आवाहन केले. परीक्षांमधील कथित गैरप्रकारांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या आंदोलनात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार, तरुण व्यावसायिक तसेच काही ज्येष्ठ नागरिकांचाही सहभाग होता. आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी न्याय मिळावा या मागणीसाठी अनेक पालकही आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलन शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्याचे आवाहन अभिजीत दीपके यांनी कार्यकर्त्यांना केले. तसेच आंदोलनादरम्यान पोलीस कर्मचाऱ्यांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी त्यांना फुले देण्याचेही आवाहन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला आहे. अभिजीत दीपके यांना अटक झाल्यास सहा आठवड्यांचे उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

**आंदोलनापासून काँग्रेस दूरच**

जंतरमंतर येथे झालेल्या कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) आंदोलनापासून काँग्रेसने सावधपणे अंतर राखले आहे. युवक काँग्रेसने सीजेपीकडून आलेल्या सहकार्याच्या प्रस्तावाला नकार दिला असून आंदोलनात सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले होते. शिक्षण व्यवस्था, परीक्षा आणि भरती प्रक्रियेतील कथित अनियमिततेविरोधात आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनाला काही विरोधी पक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळाला. पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी आंदोलनाला समर्थन दर्शविले, तर काही प्रादेशिक पक्षांनीही सहानुभूती व्यक्त केली.

# सीजेपीचा संविधानविरोधी चेहरा उघड : फडणवीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : दिल्लीतील जंतरमंतर येथे कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) आयोजित आंदोलनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र टीका केली आहे. हे आंदोलन तरुणांच्या अभिव्यक्तीचे प्रतीक नसून समाजात अराजकता निर्माण करण्याच्या मानसिकतेचे प्रदर्शन असल्याचा आरोप त्यांनी केला.

अमेरिकेतून भारतात परतल्यानंतर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी जंतरमंतर येथे आंदोलनात सहभाग घेत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. यावेळी मोठ्या संख्येने तरुण उपस्थित होते. या आंदोलनातील भाषणे आणि घोषणांचा संदर्भ देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संविधान हातात घेऊन त्याच संविधानाने निर्माण केलेल्या लोकशाही संस्था आणि व्यवस्थेविरोधात भूमिका मांडणे हे दुटप्पीपणाचे लक्षण आहे. संविधानातील मूल्ये आणि लोकशाहीची तत्त्वे नाकारणाऱ्या अशा प्रवृत्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या विरोधात असल्याचे त्यांनी म्हटले. संविधानाच्या प्रत्येक कलमात देशाच्या लोकशाही व्यवस्थेची मूलभूत तत्त्वे सामावलेली आहेत. त्या व्यवस्थेलाच आव्हान देण्याचा प्रयत्न आंदोलनातील काही वक्तव्यांतून दिसून आल्याचा आरोपही त्यांनी केला.

मुख्यमंत्री म्हणाले की, या आंदोलनातून संबंधितांचे खरे उद्देश आणि अराजकतेची मानसिकता जनतेसमोर आली आहे. अशा प्रकारच्या आंदोलनांना देशात व्यापक जनसमर्थन नसल्याचा दावा करत त्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तीला सरकार खपवून घेणार नसल्याचा इशारा दिला.

# छगन भुजबळ राज्यसभेत?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नियुक्तीनंतर रिक्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राज्यसभा जागेसाठी राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या जागेसाठी अनेक नावांची चर्चा असली तरी माजी मंत्री छगन भुजबळ यांचे नाव सर्वाधिक चर्चेत असून त्यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे.

सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी सुरुवातीपासूनच छगन भुजबळ यांच्या नावाची चर्चा होती. मात्र, अलीकडे भाजप नेत्या नवनीत राणा यांचे नावही चर्चेत आल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना उधाण आले होते.

दरम्यान, शनिवारी या संदर्भात महत्त्वाच्या राजकीय हालचाली घडल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार पार्थ पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, खासदार प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या बैठकीनंतर पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी भुजबळ यांच्या निवासस्थानी जाऊन चर्चा केली.

राज्यसभा निवडणुकीसाठी छगन भुजबळ यांच्या नावावर पक्षात एकमत होत असल्याचे संकेत मिळत आहेत. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडूनही त्यांच्या उमेदवारीबाबत सकारात्मक भूमिका घेतली जात असल्याची चर्चा आहे. अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठींकडून जाहीर होणार असला तरी भुजबळ हे राष्ट्रवादीचे उमेदवार ठरण्याची शक्यता अधिक असल्याचे मानले जाते.

## कोकणात दमदार हजेरी, आज पुण्यात दाखल होणार

# शुभवर्तमान! राज्यात मान्सूनचे आगमन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : नैऋत्य मान्सूनने अखेर महाराष्ट्रात प्रवेश केला असून भारतीय हवामान विभागाने त्याची अधिकृत घोषणा केली आहे. गोव्यात दाखल झाल्यानंतर मान्सूनने तळ कोकण गाठला असून पुढील दोन ते तीन दिवसांत राज्याच्या आणखी काही भागांत तो सक्रिय होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, रविवारी मान्सून पुणे जिल्ह्यात दाखल होण्याची शक्यता असून सोमवारी तो मुंबईपर्यंत पोहोचू शकतो. तळकोकणात मान्सून साधारणतः ५ ते ७ जूनदरम्यान पोहोचतो. यंदाही



त्याने नियोजित वेळेत प्रवेश केला आहे. शुक्रवारी मान्सूनने गोव्यात प्रवेश केल्यानंतर शनिवारी दुपारी सुमारे ३ वाजता तो सिंधुदुर्ग जिल्ह्यात दाखल झाला. मात्र, महाराष्ट्रात प्रवेश करताना त्याचा वेग काहीसा मंदावल्याचे दिसून आले. वाऱ्याचा वेग ताशी ७० ते ८० किलोमीटरवरून ताशी ५० ते ६० किलोमीटरपर्यंत कमी झाला आहे. मान्सून राज्यात दाखल झाला असला तरी अद्याप वाऱ्यांना अपेक्षित बळकटी मिळालेली नाही. त्यामुळे शनिवारी राज्यातील बहुतांश भागांत ढगाळ वातावरणासह उकाडा जाणवत होता.

कोकण किनारपट्टीवर मान्सूनची जोरदार सुरुवात झाली असून वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. मुंबईसह संपूर्ण कोकण पट्ट्यात पुढील ४८ तासांत पावसाची तीव्रता वाढण्याचे संकेत देण्यात आले आहेत. मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी वातावरण अनुकूल असल्याचेही हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मान्सूनचे अधिकृत आगमन झाल्याने नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दोडामार्गसह जिल्ह्यातील अनेक भागांत गेल्या दोन दिवसांपासून जोरदार सरी कोसळत आहेत. उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

मान्सूनच्या आगमनामुळे खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला असून ग्रामीण भागातील शेतकरी मशागतीच्या कामात व्यस्त झाले आहेत. जिल्ह्यात पुढील काही दिवस मुसळधार पावसाची शक्यता असल्याने प्रशासनानेही सतर्कतेचा इशारा दिला आहे.

दरम्यान, राज्याच्या बहुतांश भागात मान्सून सक्रिय होत असला तरी विदर्भात अद्यापही उष्णतेची लाट कायम आहे. विदर्भात मान्सूनचे आगमन उशिरा होण्याची शक्यता असून १५ जूननंतर तो या भागात पोहोचेल, असा प्राथमिक अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

## प्रशासनाला दिले कठोर कारवाईचे निर्देश

# इंधन काळाबाजार रोखण्यासाठी मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : जागतिक स्तरावरील तणाव आणि इंधन पुरवठा साखळीवरील परिणामांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या काळाबाजार, साठेबाजी तसेच अनधिकृत खरेदी-विक्रीविरोधात विशेष मोहीम हाती घेतली आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने राज्यभरातील प्रशासनाला कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत.

घाऊक औद्योगिक ग्राहकांकडून किरकोळ पेट्रोल पंपांवरून मोठ्या प्रमाणात इंधन खरेदी केली जात असल्याने सर्वसामान्य ग्राहकांच्या पुरवठ्यावर ताण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि पुरवठा विभागाला विशेष अधिकार देण्यात आले आहेत.

राज्यस्तरीय तेल उद्योग समन्वयकांच्या आकडेवारीनुसार, मे २०२६ च्या पहिल्या तीन आठवड्यांत मागील वर्षाच्या तुलनेत पेट्रोलच्या मागणीत १८.५४ टक्के आणि डिझेलच्या मागणीत २२.३ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. दुसरीकडे, अधिकृत बल्क डिझेल विक्रीत घट झाल्याचेही आढळून आले आहे.

सरकारने व्यावसायिक आणि औद्योगिक संस्थांना तेल कंपन्यांच्या थेट विक्री किंवा बल्क पुरवठा व्यवस्थेद्वारेच इंधन खरेदी करणे बंधनकारक केले आहे. नियमांचे उल्लंघन करून किरकोळ पेट्रोल पंपांवरून इंधन खरेदी करणाऱ्या औद्योगिक संस्थांबरोबरच संबंधित पेट्रोल पंप चालकांवरही जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत कारवाई केली जाणार आहे. याशिवाय, वैध कागदपत्रे आणि आवश्यक परवानग्यांशिवाय पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक करणाऱ्या अनधिकृत टँकरांवरही कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

मोहीमेचा भाग म्हणून सर्व जिल्हा प्रशासनांना पेट्रोल पंपांच्या दैनंदिन विक्रीवर डिजिटल देखरेख ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. एखाद्या पंपावरील विक्रीत अचानक वाढ आढळल्यास तत्काळ तपासणी आणि धाडी टाकण्यात येणार आहेत. आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्तही तैनात केला जाणार आहे. शेतकरी, रुग्णालये आणि मच्छिमार यांसारख्या अत्यावश्यक क्षेत्रांना इंधन पुरवठ्यात कोणताही अडथळा येऊ नये, याची काळजी घेण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

### पुणे विभागात भरारी पथके नियुक्त

**पुणे** : नीट पेपरफुटी प्रकरणानंतर चर्चेत आलेल्या इंटिग्रेटेड कनिष्ठ महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करण्यासाठी शिक्षण विभागाने हालचाली सुरू केल्या आहेत. पुणे विभागातील पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील कनिष्ठ महाविद्यालयांची विशेष पडताळणी करण्याचे आदेश शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी दिले आहेत. या आदेशानुसार संबंधित जिल्ह्यांमध्ये भरारी पथके नियुक्त करण्यात येणार असून महाविद्यालयांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजाची तपासणी केली जाणार आहे.

# राज्यभर एफडीएची धडक मोहीम

## पाच दिवसांत १९५ धाडी, १९२ आरोपी गजाआड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर सुरू केलेली विशेष मोहीम अधिक तीव्र केली आहे. १ ते ५ जून २०२६ या कालावधीत राज्यभरात १९५ धाडी टाकण्यात आल्या असून १९२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला आहे. तसेच १२३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यभर विशेष धाडसत्र राबविण्यात येत असून अवैध उत्पादन, साठवणूक, वाहतूक आणि विक्री रोखण्यासाठी कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील परंडा येथे सर्वाधिक १ कोटी २ लाख ६७ हजार २६३ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. समृद्धी महामार्गावरील सावंगी टोल नाक्यावर ६० लाख ५० हजार रुपयांचा माल आणि वाहन जप्त करण्यात आले. धुळे जिल्ह्यातील सोनगीर येथे २३ लाख ५० हजार रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला, तर नांदेडच्या महाराष्ट्र-तेलंगणा सीमाभागात १७ लाख ५२ हजार रुपयांचा माल आणि वाहन जप्त करण्यात आले.

मोशी परिसरात ६ लाख १९ हजार रुपयांचा प्रतिबंधित माल जप्त करण्यात आला असून सहा जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले. पुणे विभागात ५२ धाडी टाकून ५२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याच्या अवैध व्यापारावर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

## भारतीय उच्चायुक्तालयाने घेतली गंभीर दखल

# सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या व्याख्यानात व्यत्यय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लंडन** : भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या लंडनमधील व्याख्यानादरम्यान झालेल्या गोंधळानंतर भारतीय उच्चायुक्तालयाने संबंधित प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. काही उपस्थितांनी सरन्यायाधीशांच्या पूर्वीच्या वक्तव्यांबाबत प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केल्याने कार्यक्रमात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. युनिव्हर्सिटी ऑफ लंडनच्या बर्कबेक संस्थेत ४ जून रोजी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय कायदा या विषयावर न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे व्याख्यान



आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तर सत्रात काही उपस्थितांनी भारतातील लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि न्यायालयीन टिप्पणींशी संबंधित प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या व्हिडीओनुसार, एका उपस्थिताने भारतातील विरोधी मतांविषयी वाढत्या असहिष्णुतेचा मुद्दा उपस्थित केला. तसेच दुसऱ्या व्यक्तीने न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी १५ मे रोजी न्यायालयीन सुनावणीदरम्यान केलेल्या वादग्रस्त वक्तव्याबाबत प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र, कार्यक्रमाच्या संयोजकांनी हस्तक्षेप करत हे प्रश्न विषयाबाहेरील असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचा विषय कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय कायदा असल्याने संबंधित प्रश्न स्वीकारता येणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, काही उपस्थितांनी घोषणाबाजी आणि हातवारे केल्याने कार्यक्रमात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. आयोजकांनी उपस्थितांना शांतता राखण्याचे आवाहन केले. या घटनेचे व्हिडीओ सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आहेत.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना ब्रिटनमधील भारतीय उच्चायुक्तालयाने संबंधित वर्तनाचा निषेध केला. निवेदनात म्हटले आहे की, व्याख्यानानंतर चर्चा सुरू असताना एका व्यक्तीने कार्यक्रमाच्या प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारचे वर्तन सार्वजनिक चर्चेच्या सुसंस्कृत परंपरेला बाधा आणणारे असून स्वीकारार्ह नाही. लोकशाही व्यवस्थेत मतभिन्नता स्वाभाविक असली तरी ती व्यक्त करताना परस्पर आदर आणि शिष्टाचार पाळणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या १५ मे रोजीच्या एका न्यायालयीन निरीक्षणाचीही या निमित्ताने पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. सुनावणीदरम्यान काही व्यक्ती समाजात परजीवीप्रमाणे वागत असल्याचे उदाहरण देताना त्यांनी 'झुरळ' हा शब्दप्रयोग केला होता. या वक्तव्यावरून त्यावेळी वाद निर्माण झाला होता. त्यानंतर त्यांनी स्पष्टीकरण देत हा उल्लेख बेरोजगार तरुणांसाठी नसून बोगस पदव्या आणि गैरप्रकारांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींविषयी असल्याचे स्पष्ट केले होते.

# सीबीएसईने पुनर्मूल्यांकन अर्जाची मुदत वाढवली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) इयत्ता १२ वीच्या उत्तरपत्रिकांची पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत एक दिवसाने वाढवून ७ जूनपर्यंत केली आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या तांत्रिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

सीबीएसईने २ जूनपासून उत्तरपत्रिका पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू केले होते. मात्र, अनेक विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका पाहताना तसेच अर्ज सादर करताना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून अर्ज सादर करण्यासाठी अतिरिक्त वेळ देण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. सीबीएसईने सामाजिक माध्यमावरील पोस्टद्वारे याबाबत माहिती देत विद्यार्थ्यांनी सुधारित वेळापत्रकानुसार अर्ज सादर करावेत, असे आवाहन केले आहे.

बोर्ड परीक्षेतील गुणांबाबत असमाधानी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रतींमधील त्रुटींची पडताळणी आणि उत्तरांचे पुनर्मूल्यांकन करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. उत्तरपत्रिकेतील पाने किंवा पुरवणी पत्रके गहाळ असणे, नकाशे किंवा आलेख नसणे, पाने अस्पष्ट दिसणे, चुकीची उत्तरपत्रिका अपलोड होणे अथवा वेगळ्या प्रश्नपत्रिका संचाच्या आधारे मूल्यमापन झाल्याची शंका असल्यास विद्यार्थी तक्रार नोंदवू शकतात.

## संपादकीय

# तृणमूलमधील फुटीचे दूरगामी परिणाम

**पश्चिम बंगालच्या राजकारणाने अखेर तोच वळणदार आणि धक्कादायक मार्ग स्वीकारला आहे, ज्यावरून काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील राजकारण गेले होते. तृणमूल काँग्रेसमधील अभूतपूर्व बंडखोरी, पक्षातील मोठी फूट आणि नेतृत्वाविरोधात उभे राहिलेले आमदार यामुळे केवळ एका पक्षाचे अंतर्गत समीकरण बदललेले नाही; तर भारतीय प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. .**

पश्चिम पक्षाची स्थापना करणाऱ्या आणि दशकांहून अधिक काळ बंगालच्या राजकारणावर अधिराज्य गाजवणाऱ्या ममता बॅनर्जी यांच्यासाठी हा सर्वांत मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. विधानसभा अध्यक्षांनी ऋतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या गटाला स्वतंत्र गट म्हणून मान्यता देत त्यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती केली, तो क्षण तृणमूल काँग्रेसच्या इतिहासातील निर्णायक टप्पा ठरला. ८० पैकी तब्बल ६० आमदारांनी पक्ष नेतृत्वाविरोधात भूमिका घेतल्याने हा नेतृत्वावरील विश्वास ढासळल्याचा स्पष्ट संदेश आहे. पक्ष संघटना, नेतृत्व आणि राजकीय नियंत्रण या तिन्ही स्तरांवर ममता बॅनर्जी यांची पकड कमकुवत होत असल्याचे हे लक्षण मानावे लागेल. काही दिवसांपूर्वीपर्यंत पक्षविरोधी कारवायांचा आरोप करून ज्यांना निलंबित करण्यात आले होते, त्याच नेत्यांनी बहुसंख्य आमदारांना आपल्या बाजूला वळवून पक्षालाच आव्हान दिले. भारतीय राजकारणात हा प्रकार नवीन नाही. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जे घडले, त्याचीच पुनरावृत्ती बंगालमध्ये दिसत आहे. पूर्वी पक्षफोड म्हणजे वैचारिक संघर्ष किंवा स्वतंत्र राजकीय भूमिका मानली जात असे. आता मात्र संख्याबळ, कायदेशीर तरतुदी आणि संघटनात्मक नियंत्रण यांच्या आधारे पक्षावर मालकी हक्क सांगण्याची नवी राजकीय संस्कृती उदयास आली आहे. पक्षांतरविरोधी कायद्याची तरतूद मूळतः लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी करण्यात आली होती. मात्र, कालांतराने त्याच कायद्यातील अपवाद आणि तांत्रिक तरतुदींचा वापर करून मोठ्या प्रमाणावर गटबाजीला कायदेशीर संरक्षण मिळू लागले आहे. दोन-तृतीयांश आमदारांचे समर्थन मिळाल्यास अपात्रतेची कारवाई टाळता येते, ही बाब आता अनेक राजकीय बंडखोरींचे प्रमुख शस्त्र बनली आहे. बंगालमधील घडामोडींनी पुन्हा एकदा दाखवून दिले की, राजकारणात भावनिक निष्ठेपेक्षा आकड्यांचे गणित अधिक प्रभावी ठरत आहे. विशेष म्हणजे, बंडखोर गटाने अत्यंत सावध आणि राजकीयदृष्ट्या परिपक्व भूमिका घेतल्याचे दिसते. त्यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर थेट टीका टाळली आहे. उलट, त्या आमच्या नेत्या आहेत, असे सांगत त्यांनी संघर्षाचे केंद्र नेतृत्वाऐवजी संघटनात्मक निर्णयांवर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. ही रणनीती महाराष्ट्रातही यशस्वी ठरली होती. मूळ पक्षाच्या विचारसरणीशी आणि संस्थापकांच्या वारशाशी निष्ठा कायम असल्याचा दावा करत बंडखोर गटांनी जनतेसमोर स्वतःला वैध पर्याय म्हणून उभे केले होते. बंगालमध्येही तसाच प्रयोग होताना दिसतो. या फुटीमुळे तृणमूल काँग्रेसच्या संघटनात्मक सामर्थ्यावर मोठा परिणाम होणार आहे. पक्षातील महत्त्वाच्या पदांवर नव्या नियुक्त्या, बंडखोर नेत्यांचा वाढता आत्मविश्वास आणि प्रभावी नेत्यांचे पदत्याग हे सर्व संकेत पक्षातील अस्थिरता अधोरेखित करतात. विशेषतः दीर्घकाळ पक्षाचे विश्वासू मानले गेलेले नेते नेतृत्वापासून दूर जाऊ लागले, तर कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम आणि असुरक्षितता वाढते. या संपूर्ण प्रकरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे विधानसभा अध्यक्षांची भूमिका. महाराष्ट्रातील राजकीय संघर्षात सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णयांचे अंतिम परीक्षण अध्यक्षांच्या अधिकारक्षेत्रात सोपविले होते. त्यानंतर संख्याबळ, पक्ष संघटना आणि विधिमंडळातील समर्थन या निकषांच्या आधारे निर्णय घेतले गेले. बंगालमध्येही अध्यक्षांनी तत्परतेने निर्णय घेतल्याने राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. यामुळे न्यायालयीन आणि घटनात्मक प्रक्रियांच्या मर्यादा व परिणामकारकतेबाबतही चर्चा सुरू होणार आहे. पश्चिम बंगालचा राजकीय इतिहास पाहिला, तर सत्तेवरून खाली आलेल्या पक्षांना पुन्हा पूर्वीचे वैभव मिळविणे कठीण गेले आहे. काँग्रेसचा प्रभाव कमी झाला, त्यानंतर डाव्या पक्षांचे दीर्घकालीन वर्चस्व संपुष्टात आले. तृणमूल काँग्रेससमोर उभे राहिलेले संकट हे केवळ राजकीय आव्हान नाही; तर पक्षाच्या अस्तित्वाशी निगडित प्रश्न आहे. याशिवाय भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे निर्माण झालेली प्रतिमा, केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशा, संघटनात्मक असंतोष आणि निवडणुकीतील घसरण या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम तृणमूलवर होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत पक्षातील मोठी फूट ही नेतृत्वासाठी दुहेरी संकट ठरते. बाह्य विरोधकांशी सामना करण्यापेक्षा अंतर्गत बंडखोरी अधिक घातक असते, कारण ती पक्षाच्या पायाभूत रचनेलाच हादरा देते. भारतीय प्रादेशिक पक्षांसाठीही यात एक धडा आहे. व्यक्तिकेंद्री नेतृत्व, मर्यादित अंतर्गत लोकशाही आणि उत्तराधिकारी नेतृत्वाचा अभाव यामुळे अनेक पक्ष संकटात सापडत आहेत. आता सर्वांचे लक्ष ममता बॅनर्जी यांच्या पुढील राजकीय पावलांकडे लागले आहे. त्या संघटना पुन्हा एकत्र आणण्यात यशस्वी ठरतात की संघर्ष अधिक तीव्र होतो, यावर तृणमूलचे भवितव्य अवलंबून असेल. एवढे निश्चित की, या बंडखोरीने बंगालच्या राजकारणात नवा अध्याय सुरू केला आहे. हा अध्याय तृणमूलच्या पुनरुज्जीवनाचा ठरेल की पक्षाच्या अस्ताचा, याचे उत्तर काळच देईल.

### वीज निर्मितीचे प्रकल्प असूनही बिलात सातत्याने वाढ

# महापालिकेचे वीजबिल 158 कोटींवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेने कचऱ्यापासून वीज निर्मिती आणि सौर ऊर्जा प्रकल्पांवर भर दिला असला तरी महावितरणकडून घेतल्या जाणाऱ्या विजेचा वापर आणि त्यावरील खर्च सातत्याने वाढत असल्याचे समोर आले आहे. गेल्या आर्थिक वर्षात महापालिकेने वीजबिलापोटी तब्बल १५८ कोटी रुपयांहून अधिक रक्कम अदा केली आहे.



शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि नागरिकांना पुरवाव्या लागणाऱ्या विविध सुविधांमुळे महापालिकेची विजेची गरजही वाढत आहे. महापालिका भवन, आठ क्षेत्रीय कार्यालये, मोठी रुग्णालये, दवाखाने, आरोग्य सेवा केंद्रे, लसीकरण केंद्रे, नाट्यगृहे, शाळा तसेच जलशुद्धीकरण केंद्रे, अशुद्ध जलउपसा केंद्रे, मैलासांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प, सीसीटीव्ही यंत्रणा आणि रस्त्यांवरील दिवाबत्ती यासाठी मोठ्या प्रमाणावर वीज लागते. यासाठी महापालिकेला दरवर्षी सुमारे ७० मेगावॅट विजेची आवश्यकता भासते.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत महापालिकेने महावितरणला वीजबिलापोटी १५८ कोटी २२ लाख ३७ हजार ६७५ रुपये अदा केले आहेत. वीज निर्मितीचे पर्यायी प्रकल्प सुरू असतानाही खर्चात अपेक्षित घट झालेली नसल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे.

महापालिकेने पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी स्वतःच्या इमारतींवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यास सुरुवात केली आहे. शहरातील २६४ इमारतींपैकी ९५ इमारतींवर सौर पॅनेल बसविण्यात आले असून त्यातून सुमारे ३ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. यामुळे दरवर्षी सुमारे साडेचार कोटी रुपयांची बचत होत असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

प्राधिकरण, निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रावरील सौर ऊर्जा प्रकल्पातून दरवर्षी सर्वाधिक ४ लाख १३ हजार युनिट वीज निर्मिती होते. याशिवाय आणखी २१ इमारतींवर सौर पॅनेल बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात असून ते पूर्ण झाल्यानंतर ११६ इमारतींवर सौर ऊर्जेद्वारे वीज निर्मिती होणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील वीजदर देशात सर्वाधिक असल्याने महापालिकेच्या वीजबिलात सातत्याने वाढ होत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे महावितरणवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्पांचा विस्तार करण्याबरोबरच मोठ्या प्रमाणावर वीज खरेदी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना सवलतीचा दर मिळावा यासाठीही पाठपुरावा सुरू आहे.

महापालिका भवन, क्षेत्रीय कार्यालये, शाळा आणि अन्य कार्यालयांमध्ये वीजबचतीबाबत पुरेशी दक्षता घेतली जात नसल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी कर्मचारी किंवा अधिकारी उपस्थित नसतानाही दिवे, पंखे आणि वातानुकूलन यंत्रणा सुरूच ठेवली जात असल्याने मोठ्या प्रमाणात वीज वाया जात आहे. कार्यालये रिकामी असताना दिवे आपोआप बंद होण्यासाठी स्वयंचलित प्रणाली सुरू केल्याचा दावा यापूर्वी करण्यात आला होता. मात्र विद्युत विभाग वगळता इतर विभागांत ही व्यवस्था प्रभावीपणे कार्यान्वित नसल्याचे दिसून येत आहे.

महापालिकेच्या रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्रात सर्वाधिक वीज वापरली जाते. पवना नदीतील बंधाऱ्यातून पाणी उचलून ते निगडी-प्राधिकरण येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाठविण्यासाठी दरमहा सुमारे ४७ लाख ८७ हजार युनिट वीज खर्च होते. त्यानंतर जलशुद्धीकरण केंद्रे, मैलासांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प आणि महापालिका भवनाचा क्रम लागतो.

पिंपरी-चिंचवड शहरात सध्या १ लाख १४ हजार ४६२ दिवाबत्तीचे खांब आहेत. रस्ते, पदपथ, उद्याने आणि सार्वजनिक ठिकाणे प्रकाशमान ठेवण्यासाठी उभारण्यात आलेल्या या सर्व दिव्यांमध्ये एलईडी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तरीही या यंत्रणेसाठी दरवर्षी सुमारे ६ कोटी युनिट वीज खर्च होते. त्यासाठी जवळपास ४२ कोटी रुपयांचे वार्षिक वीजबिल येते.

अर्बन स्ट्रीट डिझाइन आणि हरित सेतू प्रकल्पांमुळे दिवाबत्तीच्या खांबांची संख्या सातत्याने वाढत असून उड्डाणपुलांवरील रोषणाईवरही मोठ्या प्रमाणात वीज खर्च होत आहे.

# नोटीस फ्लेक्स लावून कारवाईची तयारी

### अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचा नवा फंडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृत बांधकामांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून प्रशासनाच्या आदेशांना न जुमानता विविध भागांत तीन ते सहा मजली इमारती उभारल्या जात आहेत. महापालिकेकडून होणारी कारवाई अपुरी आणि दिखाऊ असल्याचा आरोप होत असताना वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर अनधिकृत इमारतींवर नोटीस दर्शविणारे फ्लेक्स लावण्याचा नवा उपाय प्रशासनाने हाती घेतला आहे. मात्र, या उपाययोजनेमुळे अनधिकृत बांधकामांना खरोखरच आळा बसेल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरातील रेडझोन, नदीकाठावरील निळी पूररेषा, हरित क्षेत्र तसेच विविध आरक्षणांच्या जागांवर बेकायदा प्लॉटिंग करून जमिनीची विक्री करण्याचे प्रकार वाढले आहेत. कमी दरात जागा उपलब्ध होत असल्याने सर्वसामान्य नागरिक अशा भूखंडांची खरेदी करतात. त्यानंतर तेथे अनधिकृत घरे व इमारती उभारल्या जातात किंवा कमी किमतीत सदनिकांची विक्री केली जाते. प्रशासनाकडून पुरेशी कारवाई होत नसल्याने अशा बांधकामांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे.

देहूरोड येथील ऑर्डनन्स फॅक्टरी डेपोच्या बाह्य सीमाभिंतीपासून सुमारे १.८२ किलोमीटर परिसर रेडझोनमध्ये येतो. तसेच दिघी येथील मॅगझिन डेपोभोवती १,१४५ मीटर परिसर रेडझोन म्हणून घोषित आहे. तळवडे, निगडी, त्रिवेणीनगर, रूपीनगर, यमुनानगर, किवळे, चिखली, दिघी, भोसरी, वडमुखवाडी, चऱ्होली, डुडुळगाव आणि बोपखेल या भागांमध्ये रेडझोनचा मोठा प्रभाव आहे. या क्षेत्रात बांधकामांना परवानगी नसतानाही प्लॉटिंग करून भूखंडांची विक्री केली जात असल्याचे चित्र आहे. याशिवाय पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीकाठच्या निळ्या पूररेषेतील भाग, हरित क्षेत्रे तसेच महापालिका, एमआयडीसी, प्राधिकरण आणि इतर आरक्षित जागांवरही बेकायदा प्लॉटिंगचे प्रकार सुरू असल्याचे समोर आले आहे. अनेक ठिकाणी तीन ते सहा मजली इमारती उभारून सदनिकांची विक्री केली जात आहे. नियमांतील पळवाटा शोधून काही बांधकामांची मिळकत नोंदणी आणि खरेदी-विक्री व्यवहारही पूर्ण केले जात असल्याचे सांगितले जाते.

महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांकडून नोटिसा बजावून कारवाई लांबणीवर टाकली जात असल्याची टीका होत आहे. आचारसंहिता, जनगणना, मतदार यादीचे काम, पावसाळा तसेच राजकीय हस्तक्षेप यांसारख्या कारणांमुळे अनेकदा प्रत्यक्ष कारवाई टाळली जाते. या वाढत्या समस्येमुळे शहराच्या नियोजनावर परिणाम होत असून नागरी सुविधांवरही अतिरिक्त ताण निर्माण होत आहे. अनधिकृत बांधकामांमुळे रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था आणि वाहतूक यंत्रणेवर दबाव वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. नोटीस फ्लेक्स लावण्याच्या नव्या उपक्रमाबरोबरच प्रत्यक्ष पाडकाम आणि कठोर अंमलबजावणीची गरज असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# मावळातील २१ गावांचे विविध निकषांवर मूल्यांकन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मावळ :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत अलिबाग पंचायत समितीच्या तालुकास्तरीय मूल्यमापन समितीने मावळ तालुक्यातील २१ ग्रामपंचायतींची पाहणी करून विविध निकषांवर मूल्यांकन केले.

हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आले असून, त्यासाठी सुमारे ३०० कोटी रुपयांच्या बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्तरावर ग्रामपंचायतींना एकूण १२ प्रकारची पारितोषिके दिली जाणार आहेत. राज्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या ग्रामपंचायतीला ५ कोटी रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.

अलिबाग पंचायत समितीच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा मूल्यमापन समितीच्या अध्यक्षा शुभांगी नाखले यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मावळ तालुक्यातील इंदोरी, जांभूळ, भोयरे, कान्हे, सुदुंबरे, देवले, सोमाटणे, दारुंब्रे, उर्से, शिरगाव, महागाव, मुंढावरे, वरसोली, कार्ला, नवलाख उंब्रे, माळेगाव बुद्रुक, वाकसई, परंदवडी, धामणे, कुणेनामा आणि करंजगाव या गावांना भेटी दिल्या. समितीमध्ये चंद्रशेखर धुमाळ, राजेश घरत, हंसराज कोकार्डे, केतुल पाटील आणि विनोद पाटील यांचा समावेश होता.

पाहणीदरम्यान सुशासनयुक्त पंचायत, आर्थिकदृष्ट्या सक्षम पंचायत, जलसमृद्ध व स्वच्छ-हरित गाव, मनरेगा आणि इतर योजनांचे अभिसरण, ग्रामस्तरीय संस्थांचे सक्षमीकरण, उपजीविका विकास, सामाजिक न्याय तसेच लोकसहभाग आणि श्रमदानातून उभारण्यात आलेल्या उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

# सार्वजनिक वाहतुकीच्या मर्यादा उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या अपुऱ्या बससंख्येमुळे, दुपारच्या वेळेत बंद असलेल्या लोकल रेल्वे सेवेमुळे आणि मेट्रोच्या मर्यादित विस्तारामुळे पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नागरिकांच्या गरजांच्या तुलनेत अपुरी पडत आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना सार्वजनिक वाहतुकीची क्षमता त्यानुसार वाढलेली नसल्याने नागरिकांचा कल खासगी वाहनांकडे वाढत आहे.

शहरातील खासगी वाहनांची संख्या आता २५ लाखांच्या घरात पोहोचली आहे. परिणामी वाहतूक कोंडी, वायू प्रदूषण, इंधनाचा वाढता वापर आणि अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. याचा परिणाम पर्यावरणाबरोबरच नागरिकांच्या आरोग्यावरही होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतुकीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत महापालिकेसह विविध शासकीय यंत्रणांनी ई-वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देणे तसेच आठवड्यातील एक दिवस सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यास प्राधान्य देण्याचे उपक्रम हाती घेतले आहेत. मात्र, सार्वजनिक वाहतुकीच्या विद्यमान मर्यादांमुळे या उपक्रमांना अपेक्षित यश मिळण्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी चौकांच्या विकासाची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** औंध-बोपोडी परिसरातील शाळांजवळील चौक अधिक सुरक्षित, सुबक आणि वाहतूकस्नेही करण्यासाठी माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण यांनी पुणे महापालिकेच्या पथ विभागाकडे निवेदन सादर केले आहे. गणेशखिंड रस्त्यावरील विविध शाळांजवळील चौकांचा सर्वंकष विकास करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याची मागणी त्यांनी केली आहे.

प्रभाग क्रमांक ८ डमधील केंद्रीय विद्यालय, डीएव्ही पब्लिक स्कूल आणि स्पायसर स्कूल परिसरात शाळा सुरू होण्याच्या तसेच सुटण्याच्या वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते.



विद्यार्थ्यांसह पालकांची मोठी वर्दळ असल्याने रस्ता ओलांडताना धोकादायक परिस्थिती निर्माण होत असल्याकडे निवेदनातून लक्ष वेधण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित चौकांमध्ये स्कूल झोन दर्शविणारे फलक, झेब्रा क्रॉसिंग, गतिरोधक, दिशादर्शक चिन्हे आणि रस्ता सुरक्षा मार्गदर्शनाची प्रभावी व्यवस्था उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळा परिसरातील भिंतींवर आकर्षक आणि प्रबोधनात्मक भित्तीचित्रे रंगविण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. विद्यार्थी, पालक आणि वाहनचालकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती व्हावी यासाठी माहितीपर फलक आणि बॅनर्स उभारण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. भित्तीचित्रांचे काम प्रभावी आणि दर्जेदार व्हावे यासाठी ललित कला किंवा व्यावसायिक कला क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती अथवा संस्थांची नियुक्ती करण्याचा आग्रहही धरण्यात आला आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा अत्यंत संवेदनशील विषय असून औंध-बोपोडी परिसरातील हजारो विद्यार्थी दररोज या मार्गाचा वापर करतात. त्यामुळे शाळांजवळील चौकांचे नियोजनबद्ध आणि सुरक्षित पद्धतीने आधुनिकीकरण करणे आवश्यक असल्याचे सनी निम्हण यांनी सांगितले.

दरम्यान, महापालिकेचे मुख्य अभियंता राजेश बनकर यांनी या मागणीची सकारात्मक दखल घेत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती निम्हण यांनी दिली.

# चाकणमध्ये अवैध गॅस सिलिंडर वाहतुकीवर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**चाकण :** घरगुती गॅस सिलिंडरची अवैधरित्या वाहतूक करून विक्रीसाठी नेण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर चाकण उत्तर पोलिसांनी कारवाई करत एका व्यक्तीला ताब्यात घेतले. या कारवाईत १ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास चाकण-आगरकरवाडी रस्त्यावरील सिद्धार्थ बौद्ध विहारासमोर ही कारवाई करण्यात आली. पोलीस शिपाई शिवाजी लोखंडे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

विवेक लालमन गुप्ता (वय ४५, रा. आगरकरवाडी, चाकण) याच्याकडे असलेल्या एमएच १४ एफटी १०६७ क्रमांकाच्या पिकअप वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये २३ भरलेले गॅस सिलिंडर आढळून आले. संबंधित सिलिंडरच्या वाहतुकीसाठी आवश्यक कागदपत्रे नसल्याने ते बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी नेले जात असल्याचे उघड झाले.

या कारवाईत ६९ हजार रुपये किमतीचे २३ गॅस सिलिंडर आणि १ लाख रुपये किमतीचे वाहन असा एकूण १ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), २८७ तसेच जीवनावश्यक वस्तू अधिनियम आणि एलपीजी पुरवठा व वितरण नियमन आदेशांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**पेन्शन कार्डच्या आमिषाला बळी**

**पिंपरी :** फेसबुकवर सीनियर सिटिझन्स पेन्शन कार्ड मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका नागरिकाची ९ लाख १६ हजार ९०० रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्यमनगर येथील स्वप्ननगरी हौसिंग सोसायटीत राहणाऱ्या फिर्यादीला फेसबुकच्या माध्यमातून पेन्शन कार्डसंदर्भात खोटी माहिती देण्यात आली.

आरोपीने विश्वास संपादन करून फिर्यादीच्या बँक खात्यांची माहिती मिळवली. त्यानंतर फिर्यादीच्या संमतीशिवाय बँक ऑफ इंडियाच्या दोन खात्यांतून टप्प्याटप्प्याने ९ लाख १६ हजार ९०० रुपये काढून घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पोलिसांत तक्रार दाखल केली.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६६(सी) आणि ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सोशल मीडियावरील आकर्षक योजना किंवा सरकारी लाभांच्या संदेशांवर विश्वास ठेवण्यापूर्वी खातरजमा करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

**दारूच्या नशेत पत्नीवर हल्ला**

**पिंपरी :** चिखली परिसरात दारूच्या नशेत पत्नीला मारहाण करून तिच्या डोक्यात दगड मारून गंभीर जखमी केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना ५ जून रोजी दुपारी दोनच्या सुमारास रोकडे वस्ती येथील महादेव मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाजवळ घडली. याप्रकरणी वर्षा राजू भुसारे (वय ३०, रा. चिखली) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यावरून राजू नामदेव भुसारे (वय ४०, रा. चिखली) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी मुलांसह घरी जात असताना आरोपी तेथे आला. त्याने शिवीगाळ करत मारहाण केली आणि रस्त्यावरील दगड उचलून त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस मारला.

या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या. भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ११५(२) आणि ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देवकुळे करीत आहेत.

# आळंदीत विदेशी मद्याची अवैध वाहतूक उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** विदेशी मद्याची अवैध वाहतूक करणाऱ्या एका तरुणावर आळंदी पोलिसांनी कारवाई करत ५ लाख २२ हजार ५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ जून रोजी दुपारी सव्वादोनच्या सुमारास मरकळ रोडवरील चऱ्होली खुर्द परिसरातील कल्चर हॉटेलसमोरील रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून संशयित वाहनाची तपासणी केली.

या कारवाईत ऋषिकेश अण्णासाहेब चव्हाण (वय २८, रा. शिवलेवस्ती, भावडी रोड, तुळापूर, ता. हवेली, जि. पुणे) याला ताब्यात घेण्यात आले. तो आपल्या ताब्यातील स्विफ्ट कारमधून विदेशी मद्याची वाहतूक करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. वाहनाची झडती घेतली असता २२ हजार ५ रुपये किमतीची विदेशी दारू आणि ५ लाख रुपये किमतीची स्विफ्ट कार असा एकूण ५ लाख २२ हजार ५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस शिपाई समीर कुंडलिक काळे यांनी फिर्याद दिली असून महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील कलम ६५(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास आळंदी पोलीस करीत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) I **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### नाणेकरवाडीत देशी दारूची वाहतूक

**चाकण :** नाणेकरवाडी परिसरात अवैध देशी दारूची वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध दक्षिण चाकण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ५ जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास नाणेकरवाडी गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. पोलीस शिपाई महेश कोळी यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. राजकुमार राममूरत बिंद (वय २८, रा. नाणेकरवाडी) आणि वाईद साजिद शेख (वय २५, रा. मेदनकरवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी एमएच १४ एमके ४२६६ क्रमांकाच्या स्कूटीवरून परवानगीशिवाय देशी दारूची वाहतूक करत होते. स्कूटीच्या डिकीत आणि बॉक्समध्ये सुमारे ३२ हजार रुपये किमतीची पॉवर लाईम ब्रँडची देशी दारू आढळून आली. सदर मद्य विक्रीच्या उद्देशाने वाहतूक केले जात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

### देहूरोडमध्ये अवैध मद्यविक्रीवर कारवाई

**देहूरोड :** अवैध मद्यविक्रीविरोधात कारवाई करत देहूरोड पोलिसांनी एका व्यक्तीला ताब्यात घेतले असून ५२ हजार ६९० रुपयांचा देशी व विदेशी मद्यसाठा जप्त केला आहे. ५ जून रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास कॅनबे चौकाजवळील शिवरत्न हॉटेल परिसरात ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गजानन भगवान हिप्परकर (वय २७, रा. गणेशनगर, स्पाइन रोड, तळवडे) याला ताब्यात घेण्यात आले आहे. तर विशाल तुकाराम भालेकर (वय अंदाजे ४०, रा. स्पाइन रोड, तळवडे) हा या प्रकरणातील पाहिजे आरोपी असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींकडे कोणतीही वैध परवानगी नसताना देशी व विदेशी मद्याचा साठा विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. जप्त करण्यात आलेला मद्यसाठा हॉटेल मालकाने पुरविल्याची माहिती समोर आली आहे.

कंपन्यांच्या बांधकाम नोंदींच्या मुद्द्यावर आरोप-प्रत्यारोप

# मोहिते-वळसे पुन्हा एकदा आमनेसामने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** चाकण एमआयडीसी परिसरातील कंपन्यांच्या बांधकाम नोंदी आणि ग्रामपंचायतींच्या महसूल नुकसानीच्या मुद्द्यावरून खेड तालुक्यातील राजकारण पुन्हा तापले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी माजी मंत्री तथा आंबेगावचे आमदार दिलीप वळसे पाटील आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे आमदार बाबाजी काळे यांच्यावर टीका केली.



चाकण एमआयडीसीमधील अनेक कंपन्यांनी स्थानिक ग्रामपंचायतींकडे बांधकाम अथवा वाढीव बांधकामांच्या नोंदी न केल्याने सुमारे १२ ग्रामपंचायतींचे दरवर्षी जवळपास २५ कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचा दावा जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे यांनी केला. यासंदर्भात शनिवारी चाकण येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

यावेळी बोलताना दिलीप मोहिते पाटील यांनी कळमोडी धरणाच्या पाण्याच्या वाटपाचा मुद्दाही उपस्थित केला. खेड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्याबाबत स्पष्ट लेखी हमी मिळाल्याशिवाय कळमोडी धरणाचे पाणी अन्यत्र देण्यास विरोध राहील, अशी भूमिका त्यांनी मांडली. कान्हेवाडी ते तिन्हेवाडी कालवा आणि वाफगाव परिसरातील सिंचनाच्या प्रश्नांवर समाधानकारक निर्णय झाल्याशिवाय पाण्याच्या वाटपाबाबत सहमती देणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, कंपन्यांच्या बांधकाम नोंदींच्या विषयावर जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्याकडे तक्रार केल्यानंतर संबंधित कंपन्यांवर कारवाईचे आदेश देण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, या कारवाईबाबत आमदार बाबाजी काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून काही व्यक्ती कंपन्यांवर दबाव टाकत असल्याचा आरोप केल्याचे मोहिते पाटील यांनी नमूद केले.

या आरोपांना प्रत्युत्तर देताना मोहिते पाटील यांनी आरोप फेटाळून लावत, आपल्याविरोधात ठोस पुरावे असल्यास पोलिसांत तक्रार दाखल करावी, अन्यथा बदनामी केल्याप्रकरणी न्यायालयात दाद मागितली जाईल, असा इशारा दिला. पत्रकार परिषदेला जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे, समीर सुपे, बाजार समिती संचालक विनोद टोपे, जयसिंग दरेकर आदी उपस्थित होते.

गणेश बोत्रे यांनी दिलेल्या माहितीनुसार, खालुंब्रे, म्हाळुंगे, खराबवाडी, नाणेकरवाडी, सावरदरी, शिंदेवस्ती, बिरदवडी, चिंबळी आणि मरकळ परिसरातील अनेक कंपन्यांनी बांधकाम अथवा वाढीव बांधकामांच्या नोंदी ग्रामपंचायतींकडे केलेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतींचा मिळून दरवर्षी सुमारे २५ कोटी रुपयांचा महसूल बुडत असल्याचा दावा त्यांनी केला.

कंपन्या, त्यांचे कर्मचारी आणि वाहतूक व्यवस्थेसाठी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधा ग्रामपंचायतींकडून पुरविल्या जात असताना महसूल न मिळाल्याने आर्थिक ताण वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषदेकडे तक्रार केल्यानंतर गेल्या दोन महिन्यांत १९८ बांधकाम नोंदी नव्याने करण्यात आल्या असून त्यातून सुमारे १३ कोटी रुपयांचा महसूल ग्रामपंचायतींना प्राप्त झाल्याचा दावाही त्यांनी केला. तसेच सर्व कारवाई नियमानुसार आणि लेखी पत्रव्यवहाराद्वारे करण्यात आल्याने दहशत निर्माण केल्याचा आरोप चुकीचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## पर्यावरण दिनानिमित्त पारगावात वृक्षारोपण



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखाना परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात कारखान्याचे संचालक रामचंद्र ढोबळे, सुरेश टावरे, माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे, मुख्य शेतकी अधिकारी दिलीप कुरकुटे, ऊस विकास अधिकारी दिनकर आदक, सोमेश्वर दीक्षित, सुरक्षा अधिकारी कैलास गाढवे, माजी उपसरपंच अशोक भोर, वन परिमंडल अधिकारी नीलम चव्हाण, वनरक्षक पूजा कांबळे, अस्मिता शिंदे, अशोक जाधव तसेच शेतकी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. परिसर अधिक हरित आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारावी, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.

## दावडी-चिंचोशी रस्त्यावरील खड्डे बुजविले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** दावडी-चिंचोशी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण झाल्याने परिसरातील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीबाबत स्थानिक ग्रामस्थांनी आमदार बाबाजी काळे यांच्याकडे निवेदन देऊन दुरुस्तीची मागणी केली होती.

गेल्या अनेक महिन्यांपासून या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. शाळकरी विद्यार्थी, शेतकरी तसेच दैनंदिन प्रवाशांना अपघाताचा धोका निर्माण झाला होता. याबाबत ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार लेखी तक्रारीही केल्या होत्या.



मागणीची दखल घेत आमदार बाबाजी काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून रस्त्याच्या दुरुस्तीबाबत सूचना केल्या. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने काम हाती घेतले. गेल्या काही दिवसांत रस्त्यावरील प्रमुख खड्डे बुजविण्यात आले असून आवश्यक त्या ठिकाणी पृष्ठभागाची दुरुस्तीही करण्यात आली आहे. पावसाळ्याच्या तोंडावर हे काम पूर्ण झाल्याने वाहनचालक आणि ग्रामस्थांना मोठा फायदा होणार आहे. रस्त्याची स्थिती सुधारल्याने वाहतूक सुरळीत झाली असून स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

दरम्यान, हा रस्ता केवळ तात्पुरता दुरुस्त न करता भविष्यात कायमस्वरूपी आणि दर्जेदार रस्ता उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात येत असल्याची माहिती आमदार बाबाजी काळे यांनी दिली. तसेच परिसरातील इतर रस्त्यांच्या दुरुस्तीची कामेही प्राधान्याने हाती घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# तहसीलदार प्रशांत बेडसे यांना दिलासा

एफआयआरच्या आदेशाला न्यायालयाची स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** शासकीय कर्तव्य बजावत असताना खोटे गुन्हे दाखल करण्याच्या आदेशाविरोधात खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली असता त्यांना दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शनिवारी (दि. ६) तातडीने सुनावणी घेत वरोरा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाने (जेएमएफसी) अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करण्यासाठी दिलेल्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली आहे.

न्यायमूर्ती प्रफुल्ल एस. खुबळकर यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. या निर्णयामुळे तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्यासह संबंधित इतर शासकीय अधिकाऱ्यांनाही तात्पुरता दिलासा मिळाला आहे.




वरोरा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाने ४ जून २०२६ रोजी भारतीय न्याय संहितेच्या कलम ६१(२), १९९, ३१६(५) आणि ३१८(४) अंतर्गत काही शासकीय अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाविरोधात तहसीलदार प्रशांत बेडसे (खेड) आणि तहसीलदार अविनाश शेंबटवाड (गडचिरोली) यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने मांडण्यात आलेल्या युक्तिवादाची दखल घेत उच्च न्यायालयाने दंडाधिकारी न्यायालयाच्या आदेशाबाबत प्राथमिक स्तरावर गंभीर निरीक्षणे नोंदवली. न्यायालयाने नमूद केले की, तक्रारीतील आरोप सर्वसाधारण स्वरूपाचे होते. तसेच कोणतेही बनावट दस्तऐवज सादर करण्यात आले नसल्याची नोंद असतानाही एफआयआर दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. याशिवाय संबंधित प्रकरणात अधिकारक्षेत्राचा प्रश्न आणि शासकीय अधिकाऱ्यांविरोधातील कारवाईसाठी आवश्यक पूर्वपरवानगीबाबतही मुद्दे उपस्थित करण्यात आले. या बाबींचा विचार करून न्यायालयाने संबंधित आदेशास अंतरिम स्थगिती दिली.

या आदेशामुळे अधिकाऱ्यांच्या सेवाकार्यात आणि कारकिर्दीत प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन न्यायालयाने हस्तक्षेप केल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, न्यायालयाने केवळ याचिकाकर्त्यांनाच नव्हे तर आदेशात नमूद असलेल्या सर्व शासकीय अधिकाऱ्यांना अंतरिम दिलासा प्रदान केला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी उच्च न्यायालयात होणार असून, अंतिम निकालाकडे प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## जलसंपदाची कार्यालये पुण्यातच ठेवावीत

आमदार बाबाजी काळे यांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** जलसंपदा विभागांतर्गत पुणे येथील मुख्य अभियंता कार्यालये कोल्हापूर आणि सोलापूर येथे स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावित निर्णयाचा पुनर्विचार करून ही दोन्ही कार्यालये पुण्यातच कायम ठेवावीत, अशी मागणी खेडचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार बाबाजी काळे यांनी केली आहे.

यासंदर्भात आमदार काळे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन सादर केले आहे. पुणे हे राज्यातील प्रमुख प्रशासकीय, शैक्षणिक आणि तांत्रिक केंद्र असल्याने जलसंपदा विभागाची महत्त्वाची कार्यालये येथे कार्यरत राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.



कार्यालयांच्या स्थलांतरामुळे विविध सिंचन व जलसंपदा प्रकल्पांचे नियोजन, अंमलबजावणी, तांत्रिक मान्यता, निधी मंजुरीची प्रक्रिया तसेच नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या कामकाजात अडचणी निर्माण होऊ शकतात, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. याशिवाय मंत्रालय, विभागीय कार्यालये आणि संबंधित यंत्रणांमधील समन्वयात विलंब होण्याची शक्यता असून त्याचा प्रशासकीय कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो, असेही त्यांनी म्हटले आहे. पुणे हे सिंचन, धरण, कालवा, जलविद्युत आणि जलव्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रकल्पांचे महत्त्वाचे केंद्र असल्याने येथील मुख्य अभियंता कार्यालयांचे स्थलांतर गैरसोयीचे ठरेल, असे मतही त्यांनी व्यक्त केले. त्यामुळे प्रस्तावित निर्णयाचा फेरविचार करून जलसंपदा विभागाची दोन्ही मुख्य अभियंता कार्यालये पूर्ववत पुण्यातच कायम ठेवावीत, अशी मागणी त्यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

## श्री छत्रपती कारखान्यात पर्यावरण दिन उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्यात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त कारखाना परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कारखाना परिसरात एक हजार झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांनी दिली.

कारखाना परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाचे काम दिवंगत अजितदादा पवार यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीतून सुरू आहे. ज्या ठिकाणी रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत, त्या परिसरात पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, उपाध्यक्ष कैलास गावडे, संचालक शिवाजी निंबाळकर, पृथ्वीराज घोलप, अशोक पाटील, अनिल काटे, प्रशांत दराडे, सुचिता सपकळ, सचिन सपकळ, कार्यकारी संचालक अशोक जाधव, जनरल मॅनेजर हनुमंत करवर, कामगार नेते युवराज रणवरे तसेच कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दिवंगत अजितदादा पवार यांना वृक्षसंवर्धनाची विशेष आवड होती. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षलागवडीवर त्यांचा नेहमी भर असे. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी यावर्षी श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात एक हजार झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष पृथ्वीराज जाचक आणि उपाध्यक्ष कैलास गावडे यांनी दिली.

## आंबेगावात उन्हाळी भुईमूग काढणीला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात उन्हाळी भुईमूग काढणीच्या कामांना वेग आला असून अनेक गावांमध्ये शेतकरी शेंगा काढणीच्या कामात व्यस्त आहेत. मात्र यंदाच्या हंगामात तीव्र उष्णता आणि पाणीटंचाईचा मोठा फटका भुईमूग पिकाला बसल्याने उत्पादनात लक्षणीय घट झाल्याचे चित्र दिसून येत आहे. अपेक्षेपेक्षा कमी उत्पादन मिळत असल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

तालुक्यातील पारगाव, शिंगवे, रांजणी, वळती, नागापूर, थोरांदळे आदी गावांमध्ये सध्या भुईमूग काढणीची कामे सुरू आहेत. मार्च ते मे या कालावधीत तापमानात झालेली मोठी वाढ, उष्ण वारे आणि मर्यादित पाणी उपलब्धता यामुळे पिकाच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला. अनेक ठिकाणी शेंगांचा आकार लहान राहिला असून झाडांवरील शेंगांचे प्रमाणही घटल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.



उत्पादन घटले असले तरी बाजारात ओल्या शेंगांना चांगली मागणी असल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळत आहे. शेतकरी ओल्या शेंगांची काढणी करून त्या थेट मंचर आणि नारायणगाव येथील बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी पाठवत आहेत. ओल्या शेंगांचे वजन अधिक असल्याने त्यांना तुलनेने चांगला दर मिळत आहे.

सध्या ओल्या भुईमुगाच्या शेंगांना दहा किलोमागे सुमारे ६०० रुपयांपर्यंत बाजारभाव मिळत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. त्यामुळे अनेक शेतकरी शेंगा वाळवून साठवण्याऐवजी थेट ओल्या शेंगांची विक्री करण्यास प्राधान्य देत आहेत.

भुईमूग हे आंबेगाव तालुक्यातील महत्त्वाचे उन्हाळी पीक मानले जाते. मात्र हवामानातील बदल, वाढती उष्णता आणि पाण्याची कमतरता यांचा परिणाम यंदा उत्पादनावर दिसून आला आहे. यंदा उष्णता खूप वाढल्याने भुईमूग पिकावर परिणाम झाला. शेंगांचे उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी मिळत आहे. मात्र सध्या ओल्या शेंगांना चांगला भाव मिळत असल्याने थेट बाजारात विक्री करत आहोत, असे रांजणी येथील भुईमूग उत्पादक शेतकरी सुधाकर हांडे यांनी सांगितले.


जनगणनेची आकडेवारीवर अनेक योजना अवलंबून

# अनुसूचित जाती प्रवर्गात अचूक नोंद करण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** सध्या सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेत बौद्ध, मातंग, चर्मकार आणि खाटीक समाजातील नागरिकांनी आपली नोंद अनुसूचित जाती प्रवर्गात अचूकपणे करून घ्यावी, असे आवाहन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक आणि संविधान भवन समितीचे अध्यक्ष गौतमराव खरात यांनी केले आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जनगणना ही केवळ लोकसंख्या



मोजण्याची प्रक्रिया नसून शैक्षणिक सुविधा, सामाजिक विकास, शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षण, विविध योजनांचा निधी तसेच राजकीय आरक्षण यांचा पाया जनगणनेतील लोकसंख्येच्या आकडेवारीवर अवलंबून असतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपली माहिती अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, मागील अनेक दशकांपासून आंबेगाव तालुक्यात अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकसंख्येची नोंद प्रत्यक्ष लोकसंख्येच्या तुलनेत कमी झाल्याचे दिसून आले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार तालुक्यात अनुसूचित जातींची लोकसंख्या ९ हजार ७२७ इतकी नोंदविण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात ही संख्या २५ हजारांहून अधिक असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

लोकसंख्येची कमी नोंद झाल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणावर परिणाम होत असून ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांमधील अनुसूचित जाती प्रवर्गाच्या आरक्षणासाठी शासन जनगणनेतील आकडेवारीचा आधार घेत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून अनुसूचित जाती प्रवर्गातील नागरिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधित्वापासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

सध्या सुरू असलेल्या जनगणनेतील संबंधित घटकांमध्ये आपली जात आणि प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगत बौद्ध, मातंग, चर्मकार आणि खाटीक समाजातील नागरिकांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील नोंद चुकवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

युगप्रवर्तक प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक आणि संविधान भवन समितीच्या वतीने हे आवाहन करण्यात आले असून भविष्यातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांच्या दृष्टीने जनगणनेत अचूक माहिती देणे आवश्यक असल्याचे गौतमराव खरात यांनी स्पष्ट केले.

## काळकाई वस्ती परिसरात बिबट्या जेरबंद; ग्रामस्थांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील बेलसरवाडी-निरगुडसर येथील काळकाई वस्ती परिसरात वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात एक बिबट्या जेरबंद करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून या भागात बिबट्याच्या हालचाली आढळत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण होते. त्यानंतर वन विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून परिसरात पिंजरा लावला होता. त्यामध्ये शुक्रवारी रात्री बिबट्या अडकला. मात्र, स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार या परिसरात अद्याप आणखी तीन बिबटे वावरत असल्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी एकटे बाहेर जाणे टाळावे, लहान मुले आणि पाळीव जनावरांवर लक्ष ठेवावे, असेही सांगण्यात आले आहे.

वन विभागाकडून परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत असून उर्वरित बिबट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. कोणाला बिबट्या दिसल्यास किंवा त्याच्या हालचाली आढळल्यास तात्काळ वन विभाग अथवा स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

## सारांश वृत्त

### केरळ सरकारवर विजयन यांची टीका

**जबलपूर:** मध्य तिरुवनंतपुरम केरळमध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे वाढत्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीशन आणि माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. वनमंत्री ए. के. शशिंद्रन यांनी अशा घटनांमध्ये मृत्यू होणे अपरिहार्य असल्याचे केलेले वक्तव्य बेजबाबदार असल्याचा आरोप विजयन यांनी केला. मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्यासाठी सरकारकडे ठोस धोरण नसल्याचे त्यांनी म्हटले. वनक्षेत्रालगत राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून त्यांचे संरक्षण करणे ही सरकारची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### भिंत कोसळून सख्ख्या भावांचा मृत्यू

**कासरगोड** : केरळमधील कासरगोड जिल्ह्यात संरक्षक भिंत कोसळून दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मुसळधार पावसामुळे ही दुर्घटना घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मृत्यू झालेल्या दोन्ही भावांवर ढिगारा कोसळल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली होती. स्थानिक नागरिक आणि बचाव पथकाने त्यांना तातडीने बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

### अमेठीत अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**अमेठी** : उत्तर प्रदेशातील अमेठी जिल्ह्यात पाच वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एका दुकानदाराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही घटना कमरौली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात घडली. मुसाफिरखाना विभागाचे पोलिस उपअधीक्षक अतुलकुमार सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला ताब्यात घेऊन त्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

---

### काँग्रेसकडे केली स्पष्टीकरणाची मागणी

# केरळमधील आरोपांवरून माकप आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केरळ विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान डाव्या पक्षांनी भाजपशी सामंजस्य केल्याचा काँग्रेसने केलेला आरोप आता इंडिया आघाडीत वादाचा विषय ठरला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस एम. ए. बेबी यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून या आरोपांबाबत स्पष्टीकरण मागितले असून माकपवरील हल्ल्यांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पत्राच्या प्रती इंडिया आघाडीतील इतर घटक पक्षांनाही पाठविण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

बेबी यांनी पत्रात म्हटले आहे की, राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी केरळ निवडणुकीदरम्यान डावे पक्ष आणि भाजप यांच्यात राजकीय समझोता झाल्याचे वारंवार आरोप केले. तसेच तत्कालीन मुख्यमंत्री पिनराई विजयन यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी विशेष संबंध असल्याचा प्रचार करण्यात आला. हे आरोप केवळ निवडणूक प्रचारापुरते मर्यादित नसून इंडिया आघाडीच्या सहकार्याच्या भावनेलाच धक्का देणारे असल्याचे त्यांनी नमूद केले.

माकपने काँग्रेसवर केरळमध्ये डाव्या पक्षांविरोधात पद्धतशीर प्रचार केल्याचा आरोप केला आहे. भाजपविरोधी राजकीय लढ्यासाठी इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली असून विविध विचारधारांचे पक्ष त्यात सहभागी आहेत. अनेक राज्यांत हे पक्ष परस्परांचे निवडणूक प्रतिस्पर्धी असले तरी राष्ट्रीय स्तरावर भाजपविरोधी एकजूट मजबूत करण्यासाठी ते एकत्र आले असल्याचे बेबी यांनी स्पष्ट केले.

२०२३ मध्ये इंडिया आघाडी स्थापन झाल्यापासून माकपने विरोधी ऐक्य मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, राष्ट्रीय स्तरावर सहकार्य करत असताना केरळमध्ये भाजपशी हातमिळवणी केल्याचे आरोप करणे हा विरोधाभास असल्याचे त्यांनी काँग्रेसच्या निदर्शनास आणून दिले.

८ जून रोजी होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीपूर्वी काँग्रेसने या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडावी आणि निर्माण झालेला संभ्रम दूर करावा, अशी मागणी बेबी यांनी केली आहे. अन्यथा इंडिया आघाडीच्या उद्दिष्टांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, या वादानंतरही माकपने इंडिया आघाडीप्रती आपली बांधिलकी कायम असल्याचे स्पष्ट केले आहे. नरेंद्र मोदी सरकारच्या हुकूमशाही, जातीयवादी आणि जनविरोधी धोरणांविरोधात संसदेत तसेच देशभरात इंडिया आघाडीतील पक्षांसोबत संयुक्तपणे लढा सुरू ठेवण्यात येईल, असे बेबी यांनी म्हटले आहे.

सोमवारी नवी दिल्ली येथे इंडिया आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक होणार असून भाजपविरोधी रणनीती आणि विरोधी पक्षांतील समन्वय यावर चर्चा होण्याची शक्यता आहे. या बैठकीला ममता बॅनर्जी, उद्धव ठाकरे, अखिलेश यादव, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. मात्र, द्रमुक आणि आम आदमी पक्षाचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित राहणार नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

---

# चिनाबवरील रखडलेल्या जलविद्युत प्रकल्पाला गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सिंधू जल कराराला स्थगिती दिल्यानंतर केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरमधील चिनाब नदीवरील रखडलेल्या किर्थाई-२ जलविद्युत प्रकल्पाला गती देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीला वेग देण्यासाठी केंद्राने संदर्भाच्या अटी (टर्म्स ऑफ रेफरन्स) जम्मू-काश्मीर राज्य ऊर्जा विकास महामंडळाकडून चिनाब व्हॅली पॉवर प्रोजेक्ट्स लिमिटेडकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे.

९३० मेगावॅट क्षमतेचा किर्थाई-२ प्रकल्प जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यातील चिनाब नदीवर प्रस्तावित असून त्याची संकल्पना प्रथम १९८४ मध्ये मांडण्यात आली होती. मात्र विविध प्रशासकीय, पर्यावरणीय आणि आंतरराष्ट्रीय कारणांमुळे प्रकल्पाची अंमलबजावणी रखडली होती.

एप्रिल २०२५ मध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल कराराला स्थगिती दिल्यानंतर चिनाब नदीवरील अनेक प्रलंबित जलविद्युत प्रकल्पांना पुन्हा गती मिळाली आहे. यापूर्वी पाकिस्तानकडून सातत्याने आक्षेप घेतले जात असल्याने काही प्रकल्पांच्या प्रगतीवर परिणाम झाला होता. किर्थाई-२ प्रकल्पासाठी जम्मू-काश्मीर राज्य ऊर्जा विकास महामंडळाला २०१३ मध्ये पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अभ्यासासाठी आवश्यक परवानगी देण्यात आली होती. त्यानंतर पर्यावरणीय मंजुरीची प्रक्रिया सुरू झाली. तज्ज्ञ मूल्यांकन समितीने या प्रस्तावाचा आढावा घेत प्रकल्पाला काही अटींसह पर्यावरणीय मंजुरी देण्याची शिफारस केली होती. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय जलविद्युत महामंडळ आणि जम्मू-काश्मीर राज्य ऊर्जा विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने चिनाब व्हॅली पॉवर प्रोजेक्ट्स लिमिटेड ही कंपनी स्थापन करण्यात आली. यानंतर प्रकल्पाचे तांत्रिक आणि आर्थिक मूल्यांकन नव्या कंपनीच्या नावे हस्तांतरित करण्यात आले.

---

# विजय याचे सरकार द्रमुकच्या पाठिंब्यामुळेच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** तामिळनाडूतील मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) सरकार केवळ द्रमुक आणि तिच्या मित्रपक्षांच्या पाठिंब्यामुळे सत्तेत राहू शकले, असा दावा द्रमुक अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केला आहे. तसेच या सरकारला सत्तेवरून हटविण्याचा निर्धार करण्याचे आवाहन त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांना केले. चेन्नई येथे द्रमुकमध्ये प्रवेश केलेल्या अण्णाद्रमुकच्या १,००० हून अधिक कार्यकर्त्यांच्या स्वागतासाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

स्टॅलिन म्हणाले की, विधानसभा निवडणुकीनंतर त्यांच्या काही मित्रपक्षांनी टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाची माहिती त्यांनी आपल्याला दिली होती. त्या वेळी आपण त्यांना तो त्यांचा लोकशाही अधिकार असल्याचे सांगून अडवले नव्हते, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होऊ नये आणि त्यामुळे भाजपला अप्रत्यक्षपणे सत्तेची संधी मिळू नये, या भूमिकेतून आपण मित्रपक्षांच्या निर्णयाला विरोध केला नसल्याचे स्टॅलिन यांनी सांगितले.

आपल्या भाषणात त्यांनी द्रमुकच्या राजकीय इतिहासाचाही आढावा घेतला. १९४९ मध्ये पक्षाची स्थापना झाल्यानंतरचा प्रवास, आणीबाणीचा काळ, १९७६ मध्ये द्रमुक सरकारची बरखास्ती तसेच त्यानंतरचे राजकीय चढ-उतार यांचा उल्लेख त्यांनी केला. राजकारणात विजय आणि पराभव हे कायमचे असतात. द्रमुकचा कार्यकर्ता विजयाने हुरळून जात नाही किंवा पराभवाने खचूनही जात नाही, असे सांगत त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांना संघटनात्मक बळकटीवर भर देण्याचे आवाहन केले. सध्याचे सरकार द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीतील पक्षांच्या पाठिंब्यामुळेच अस्तित्वात आहे, असा दावा स्टॅलिन यांनी केला.

---

# दिल्ली-सिलीगुडी बुलेट ट्रेनचा प्रस्ताव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील रेल्वे पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी केंद्र सरकारकडून महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिल्ली ते सिलीगुडी दरम्यान बुलेट ट्रेन मार्गाचा प्रस्ताव असल्याचे सांगत हा प्रवास अवघ्या सहा तासांत पूर्ण होऊ शकेल, असा दावा केला.

राज्य सचिवालय नबन्ना येथे झालेल्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना वैष्णव म्हणाले की, प्रस्तावित उच्चगती रेल्वे मार्ग दिल्ली, लखनौ, वाराणसी, पाटणा मार्गे सिलीगुडीला जोडेल. या प्रकल्पामुळे उत्तर भारत आणि पूर्व भारतातील संपर्क अधिक वेगवान होणार आहे. याचवेळी त्यांनी कोलकाता मेट्रोच्या विस्तारासंदर्भातही महत्त्वाची घोषणा केली. पुढील पाच वर्षांत कोलकाता मेट्रोसाठी ६० नव्या पिढीच्या रेल्वेगाड्या दाखल केल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांनी राज्यात सुमारे एक लाख कोटी रुपयांचे रेल्वे प्रकल्प प्रस्तावित असल्याचे सांगितले. या प्रकल्पांसाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना वेळबद्ध नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राज्य आणि केंद्र सरकार यांच्यातील समन्वय वाढल्याने रेल्वे प्रकल्पांच्या अंमलबजावणीला गती मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री अधिकारी यांनी व्यक्त केला.

रेल्वेमंत्री वैष्णव म्हणाले की, भूसंपादन आणि विविध प्रशासकीय मंजुरींमध्ये राज्य सरकारचे सहकार्य मिळाल्यास रेल्वे प्रकल्प अधिक वेगाने पूर्ण करता येतील. रेल्वे संपर्क विस्तार आणि सुरू असलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत पश्चिम बंगालमधील विविध रेल्वे प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच भूसंपादन आणि प्रकल्प मंजुरींसंबंधी प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

---

# संदेशखलीतील छाप्यात मोठा शस्त्रसाठा जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील संदेशखली परिसरात विशेष कृती दलाने (एसटीएफ) केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त केला असून या प्रकरणी आणखी एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

तपास यंत्रणांच्या मते, जप्त करण्यात आलेल्या शस्त्रसाठ्याचा संबंध तृणमूल काँग्रेसचे माजी नेते शेख शाहजहाँ यांच्याशी असू शकतो. मात्र, याबाबतचा अंतिम निष्कर्ष तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. एसटीएफच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संदेशखली परिसरातील विविध ठिकाणी छापेमारी सुरू असून आणखी काही ठिकाणांची माहिती मिळाली आहे. त्यामुळे शोधमोहीम सुरूच राहणार आहे.

शेख शाहजहाँ हे जानेवारी २०२४ मध्ये अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) अधिकाऱ्यांवरील हल्ल्याप्रकरणी चर्चेत आले होते. त्या वेळी त्यांच्या कथित ठिकाणांवर छापे टाकण्यासाठी गेलेल्या ईडी पथकावर हल्ला झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या घटनेत काही अधिकारी जखमी झाले होते. त्यानंतर शेख शाहजहाँ यांच्यावर जमीन बळकावणे, धमकावणे, खून आणि लैंगिक शोषणासह विविध आरोप करण्यात आले. या प्रकरणामुळे संदेशखली राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आले होते. नंतर तृणमूल काँग्रेसने त्यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. शेख शाहजहाँ यांना अटक करण्यात आली होती आणि ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. तपासादरम्यान एका मत्स्यपालन प्रकल्पाजवळील ठिकाणाहून आठ मोठी आणि पाच लहान अशी एकूण १३ शस्त्रे जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

---

### अन्नामलाईंची स्वतंत्र राजकीय चळवळीची घोषणा

# भाजपला तामिळनाडूत मोठा धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई :** तामिळनाडू भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि माजी आयपीएस अधिकारी अन्नामलाई यांनी भाजपचा राजीनामा देत स्वतंत्र राजकीय चळवळ सुरू करण्याची घोषणा केली आहे. भाजप आणि अण्णाद्रमुक यांच्यात झालेल्या युतीबाबत मतभेद असल्याचे स्पष्ट करत त्यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

राजीनामा पत्रात अन्नामलाई यांनी गेल्या १८ महिन्यांपासून पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाशी तामिळनाडूच्या राजकारणाविषयी अनेक मुद्द्यांवर मतभेद असल्याचे नमूद केले आहे. तामिळनाडूच्या विकासाभिमुख आणि सांस्कृतिकदृष्ट्या जोडलेल्या राजकारणाबाबत आपला दृष्टिकोन आणि पक्ष नेतृत्वाची भूमिका यामध्ये फरक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

भाजपमधून बाहेर पडताच अन्नामलाई यांनी नव्या राजकीय चळवळीची घोषणा केली. त्यांच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाल्याचा दावा करण्यात येत असून पहिल्या २४ तासांत सुमारे १४ लाख लोक या चळवळीशी जोडल्याचे सांगण्यात आले आहे. अधिकृत संकेतस्थळाच्या माध्यमातून नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अन्नामलाई यांनी २०२० मध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांची पक्षाच्या राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली आणि पुढे त्यांच्याकडे तामिळनाडू भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. राज्यात भाजपचा जनाधार वाढविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे मानले जाते.

नव्या चळवळीबाबत बोलताना अन्नामलाई यांनी पारदर्शक आणि मूल्याधिष्ठित राजकारणाचा पुरस्कार केला. पक्षातील पदांवर दीर्घकाळ एकाच व्यक्तीचे वर्चस्व राहणार नाही, तसेच राजकीय वारसा निर्माण करणाऱ्या पद्धतींना आळा घालण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले. सोशल मीडियावरील संदेशात त्यांनी स्वतःमध्ये बदल घडवून समाजपरिवर्तन घडविण्याचा संदेश दिला. स्वतःला बदलल्यास समाजातही सकारात्मक बदल घडू शकतो, असे त्यांनी नमूद केले.

अन्नामलाई यांच्या राजीनाम्यानंतर भाजपला धक्के बसण्यास सुरुवात झाली आहे. तामिळनाडू भाजप युवा मोर्चाचे कायदेशीर संयोजक अभिलाष गोपीनाथ यांनीही पक्षाचा राजीनामा दिला आहे. अन्नामलाई यांच्या नेतृत्वामुळेच आपण राजकारणात आलो असल्याचे त्यांनी आपल्या राजीनामा पत्रात म्हटले आहे.

---

# देहरादूनमध्ये मशीद सील केल्याने तणाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**देहरादून :** उत्तराखंडमधील देहरादूनच्या थानो परिसरातील जामा मशीद सील करण्याच्या कारवाईनंतर परिसरात तणाव निर्माण झाला आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ मुस्लिम सेवा संघटनेच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत मशीद तातडीने पुन्हा सुरू करण्याची मागणी केली.

मसुरी-देहरादून विकास प्राधिकरणाने (एमडीडीए) बांधकाम आणि जमिनीच्या कागदपत्रांतील कथित अनियमिततांच्या चौकशीनंतर तीन दिवसांपूर्वी जामा मशीद सील केली होती. या कारवाईला स्थानिक नागरिक आणि मुस्लिम सेवा संघटनेने विरोध दर्शवत ती एकतर्फी असल्याचा आरोप केला आहे. मोर्चादरम्यान आंदोलकांनी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली. अनेक वर्षांपासून या मशिदीत नमाज अदा करणाऱ्या नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

मुस्लिम सेवा संघटनेचे अध्यक्ष नईम अहमद कुरेशी यांनी सांगितले की, थानो येथील जामा मशीद अनेक वर्षांपासून परिसरातील नागरिकांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. कोणतीही पूर्वसूचना, संवाद किंवा पर्यायी प्रक्रिया न राबवता धार्मिक स्थळ सील करणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले. कुरेशी यांच्या मते, संबंधित बांधकाम हे उत्तराखंड अल्पसंख्याक विभागाकडून मंजूर करण्यात आलेल्या निधीतून करण्यात आले होते. थानो जामा मशिदीसाठी खोली बांधण्याकरिता निधी मंजूर झाला होता आणि हे बांधकाम संबंधित शासकीय विभागाने केले होते. त्यामुळे इमारत आराखडा मंजुरीची जबाबदारीही त्या विभागाची होती, असा दावा त्यांनी केला.

मशिदीचे इमाम यासर अराफत यांनीही कारवाईवर नाराजी व्यक्त केली. त्यांनी ही कारवाई बेकायदेशीर असल्याचा आरोप केला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्राधिकरणाने मागितलेली आवश्यक कागदपत्रे संबंधितांकडून सादर करण्यात आलेली नव्हती. तसेच या बांधकामाबाबत काही हिंदू संघटनांनीही आक्षेप नोंदविल्याने प्रकरणाची चौकशी करण्यात आली. त्यानंतर नियमानुसार परिसर सील करण्याची कारवाई करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

---

### हिमाचल प्रदेशात १२ जूनपर्यंत पाऊस

**शिमला :** हिमाचल प्रदेशातील काही भागांत हलक्या पावसाची नोंद झाली असून राज्यात १२ जूनपर्यंत पावसाची शक्यता असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तसेच ११ आणि १२ जून रोजी काही ठिकाणी वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता लक्षात घेऊन पिवळा इशारा जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत पंडोह येथे सर्वाधिक १२.४ मिमी पावसाची नोंद झाली.

---

# नड्डा यांनी खर्गे यांचे आरोप फेटाळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या निष्कर्षांवरून काँग्रेस आणि भाजप यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी अहवालातील निष्कर्षांचा दाखला देत केंद्र सरकारवर टीका केल्यानंतर केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी त्यांचे आरोप फेटाळून लावले आहेत.

नड्डा यांनी खर्गे यांच्यावर सर्वेक्षणातील आकडेवारीचे निवडक वाचन केल्याचा आरोप केला. सार्वजनिक आरोग्यासारख्या महत्त्वाच्या विषयाकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहणे योग्य नसल्याचे सांगत त्यांनी एनएफएचएस-६ अहवालात भारताच्या आरोग्य व्यवस्थेतील लक्षणीय सुधारणा अधोरेखित झाल्याचा दावा केला. यापूर्वी मल्लिकार्जुन खर्गे यांनी एनएफएचएस-६ च्या निष्कर्षांचा हवाला देत मोदी सरकारच्या काळात महिला आणि बालकांच्या आरोग्य व पोषण क्षेत्रात अपेक्षित प्रगती झालेली नसल्याचा आरोप केला होता.

त्याला प्रत्युत्तर देताना नड्डा यांनी मातृ आरोग्य क्षेत्रातील सुधारणांची आकडेवारी मांडली. एनएफएचएस-३ च्या तुलनेत पहिल्या तिमाहीतील प्रसूतीपूर्व नोंदणीचे प्रमाण ४३.९ टक्क्यांवरून ७६.२ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे त्यांनी सांगितले. संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण ९०.६ टक्क्यांपर्यंत, तर कुशल आरोग्य कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या प्रसूतींचे प्रमाण ९१.३ टक्क्यांपर्यंत वाढल्याचा दावा त्यांनी केला.

---

### रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी दिला इशारा

# भारताच्या सार्वभौम निर्णयांमध्ये हस्तक्षेप करू नका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**सेंट पीटर्सबर्ग :** भारताच्या सार्वभौम निर्णयांवर निर्बंधांच्या माध्यमातून दबाव आणण्याचा कोणताही प्रयत्न उलट परिणाम करणारा ठरेल, असे मत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी व्यक्त केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत नेहमीच आपल्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सेंट पीटर्सबर्ग आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेदरम्यान जागतिक वृत्तसंस्थांच्या प्रमुखांशी संवाद साधताना पुतीन यांनी हे वक्तव्य केले. भारतावर संभाव्य निर्बंध किंवा दबावाच्या शक्यतेबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचे कौतुक केले. भारत हा सार्वभौम देश असून तो नेहमीच स्वतःच्या राष्ट्रीय हितानुसार निर्णय घेतो. कोणत्याही प्रकारच्या दबावाला किंवा निर्बंधांच्या धमक्यांना भारत झुकत नाही, असे पुतीन यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दीर्घकाळापासूनचे संबंध अधोरेखित करताना पुतीन यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळाचाही उल्लेख केला. त्या काळात काही निर्बंधांचा सामना करावा लागला होता, मात्र नंतर भारत-अमेरिका संबंधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाल्याचे त्यांनी नमूद केले.

भारताने रशियन बनावटीची एस-५०० हवाई संरक्षण प्रणाली किंवा सुखोई एसयू-५७ लढाऊ विमाने खरेदी केल्यास अमेरिकेच्या निर्बंधांचा धोका निर्माण होऊ शकतो का, या प्रश्नावर पुतीन म्हणाले की, भारताला आपल्या गरजेनुसार आणि हितानुसार सर्वाधिक उपयुक्त संरक्षण प्रणाली निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. भारत नेहमीच स्वतःच्या राष्ट्रीय हिताच्या मार्गावर चालतो आणि भविष्यातही तसेच राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रशिया आणि भारत यांच्यातील संरक्षण सहकार्याबाबत बोलताना पुतीन यांनी दोन्ही देशांमधील संबंध परस्पर विश्वासावर आधारित असल्याचे सांगितले. हे संबंध केवळ खरेदी-विक्रीपुरते मर्यादित नसून संयुक्त संशोधन आणि विकासावरही आधारित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ब्रह्मोस क्षेपणास्त्र प्रकल्पाचा उल्लेख करताना त्यांनी दोन्ही देशांच्या तज्ज्ञांनी संयुक्तपणे विकसित केलेल्या या प्रकल्पाचे उदाहरण दिले. तसेच पाचव्या पिढीच्या सुखोई एसयू-५७ स्टेल्थ लढाऊ विमानाच्या संयुक्त विकासाचा प्रस्ताव पूर्वी भारताला देण्यात आला होता. तो प्रत्यक्षात आला नसला तरी रशियाने हा प्रकल्प स्वतंत्रपणे पूर्ण केला असून भारताला ही विमाने विकण्यास आपण तयार असल्याचे पुतीन यांनी सांगितले.

अनेक दशकांपासून भारताचा प्रमुख संरक्षण भागीदार असलेल्या रशियासोबतचे संबंध कायम मजबूत असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, भारताने स्वदेशी अॅडव्हान्स्ड मल्टीरोल कॉम्बॅट एअरक्राफ्ट (एएमसीए) प्रकल्पावर भर दिला असला तरी हवाई दलाच्या तातडीच्या गरजा लक्षात घेता एसयू-५७ विमानांच्या खरेदीचा पर्यायही चर्चेत असल्याचे संरक्षण क्षेत्रातील सूत्रांकडून सांगितले जात आहे.